**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १७/२०२० मधील**
**निशाणी क्र. ५ खालील आदेश**
**CNR No.MHPU170002752020.**
**रेश्मा शेख वगैरे वि. शाहीद शेख वगैरे.**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज, महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ गैरअर्जदार याचेकडून अर्जदार यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. ३,०००/– प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे अर्जातील कथने व अर्जदार यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद असा की, अर्जदार हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ याचेसोबत झाले. सदर लग्न झाल्यापासुन गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिच्या चारित्र्यावर संशय घेवुन, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ हिस रात्री अपरात्री मारहाण करुन तिचा अमानुष छळ केला. गैरअर्जदार क्र.१ कडुन अर्जदार क्र.१ हीस अर्जदार क्र.२ व ३ ही अपत्ये झाली. अर्जदार क्र.१ हिचेविरुध्द गैरअर्जदार क्र.१ याने खोटी एन.सी.दाखल करुन तिला घराबाहेर हाकलुन दिले व तिला नांदविण्यास नकार दिला.

३. अर्जदारांचे कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ हा मुंबईमध्ये रिक्षा चालवत असुन त्यापासुन तो दरमहा ३०,०००/– रुपये कमवितो. गैरअर्जदार क्र.२ हा नोकरी करतो व गैरअर्जदार क्र.३ याचा कापड व्यवसाय आहे. त्यामुळे, गैरअर्जदार यांच्याकडे अर्जदार यांना अंतरीम पोटगी देण्याची ऐपत आहे. तथापि, अर्जदार क्र.१ हीस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार क्र.२ व ३ यांच्या

शिक्षणाची जबाबदारी तिच्यावर असुन अर्जदार क्र.१ हीस सदर खर्च करणे अडचणीचे होत आहे, म्हणुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४.   गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे म्हणणे निशाणी क्र. १८ वर दाखल केले असुन त्याने अर्जदारांचे अर्जातील मजकुर खोटा व लबाडीचा असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार क्र.१ याचे कथन की, प्रस्तुतचा अर्ज चालविण्याची अधिकार कक्षा या मे. न्यायालयास नाही. अर्जदार क्र.१ हीने गैरअर्जदार क्र.१ याचा स्वतःहुन त्याग करुन, तसेच पर–पुरुषाशी संबंध ठेवुन मुंबई येथे स्वतंत्र वास्तव्य करीत आहे. अर्जदार क्र.१ हिचे समीर याच्याबरोबर अनैतिक संबंध असुन, दिनांक ०८/०७/२०२० रोजी त्यांनी मिळुन गैरअर्जदार क्र.१ यास मारहाण केली, म्हणुन त्याने मालवणी पोलीस ठाण्यामध्ये अर्जदार क्र.१ विरुध्द अदखलपात्र गुन्हे दाखल केले.

५.   गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.२ व ३ याच्या शिक्षणाचा व राहणीमानाचा खर्च वारंवार देत आहे. याऊलट अर्जदार क्र.१ ही शारिरीकदृष्टया सक्षम असुन ती मजुरीचे काम करुन दरमहा साडेचार ते पाच हजार रुपये मिळवित आहे. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.२ व ३ यांना देत असलेल्या जीवनावश्क गरजांचा खर्च व अर्जदाराचे उत्पन्नातुन त्यांचे  चांगल्याप्रकारे भागत आहे. अर्जदार क्र.१ हिच्या अर्जातील मागण्या या अवास्तव व अवाजवी असुन, अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्याने केलेली आहे.

६. अर्ज, म्हणणे व अभिलेखावर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले तसेच युक्तीवाद ऐकला असता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात, त्यावर कारणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार यांनी हे सिध्द केले आहे काय की, ते मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून दरमहा प्रत्येकी रक्कम रु.३,०००/- मिळण्यास पात्र आहेत ? असल्यास किती ? | अंशतः होय. अर्जदार हे दरमहा प्रत्येकी रक्कम रु. ६०० /- प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. |
| २) | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता -</u>**

७. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ हे पती-पत्नी असुन, अर्जदार क्र.२ व ३ ही त्यांची अपत्ये आहेत, या बाबी वादातीत नाहीत. अर्जदार क्र.१ हिने शपथेवरती कथन केले आहे की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस हाकलुन दिले, त्यानंतर अर्जदार हे अर्जदार क्र.१ हिच्या आईकडे मौजे गागरगाव येथे आलेले आहेत. तदनंतर, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांच्या पालनपोषणाची काहीएक तजवीज केली किंवा कसे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिचा पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचा पिता असल्याने अर्जदारांचा सांभाळ करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी त्याचेवरती आहे. परंतु, गैरअर्जदार क्र.१ याने त्याची कायदेशीर व नैतिक जबाबदार पार पाडल्याचे दिसुन येत नाही.

८. अर्जदारांचे कथन की, गैरअर्जदार क्र.१ हा रिक्षा ड्रायव्हर असुन त्यापासुन तो दरमहा रक्कम रुपये ३०,०००/– कमवितो. गैरअर्जदार क्र.१ याने त्याच्याकडे कोणतेही वाहन नसल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार क्र.१ याने तो काय काम करतो याबाबत निश्चित असे कथन केलेले नाही. याऊलट, अर्जदार यांनी शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे रिक्षा आहे. परंतु, अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र.१ यास दरमहा रक्कम रुपये ३०,०००/– इतके उत्पन्न मिळत असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

९. गैरअर्जदार क्र.१ याचे कथन की, तो अर्जदार क्र.२ व ३ यांना त्यांच्या शिक्षणाचा व राहणीमानाचा खर्च देत आलेला आहे. परंतु, त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. यावरुन तसेच अर्जदारांच्या शपथेवरील कथनांवरुन गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसुन येते. तथापि, गैरअर्जदार क्र.१ यास तो करीत असलेल्या कामापासून साधारणतः दरमहा रक्कम रु. ८,०००/– ते ९,०००/– इतके उत्पन्न मिळणे स्वाभाविक आहे. गैरअर्जदार क्र.१ याच्यावर अर्जदारांच्या पालनपोषणाची तजवीज करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी होती व आहे, ती त्याने पार पाडल्याचे दिसून येत नाही.

१०. वर नमूद गोष्टींचा एकत्रीत विचार करता, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. ६००/– अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून, मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्याचा आदेश

होणे न्यायोचीत वाटते. म्हणून मुद्दा क्र. १ करीता, अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता –</u>**

११. मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष विचारात घेता, अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून दरमहा प्रत्येकी रक्कम रु. ६००/– अंतरिम पोटगी म्हणुन मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

३) सदर आदेशाची प्रत अर्जदार क्र.१ हिस विनामुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRAKASH LALASAHEB PATIL
Date: 2022.03.03 11:07:29 +0530

इंदापूर. ( पी. एल. पाटील )
दिनांक –०२.०३.२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

प्र मा ण प त्र

'' मी, याद्वारे, असे प्रमाणित करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ.फाईलच्या आदेशातील मजकुर हा तिच्या मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दांनुसार समान आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | र. सि. पारवे,<br>लघुलेखक निम्नश्रेणी –३. |
| न्यायालयाचे नांव व पदनाम | - | पी.एल.पाटील,<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| आदेशाची तारीख | - | ०२/०३/२०२२. |
| आदेश न्यायिक अधिकारी यांनी स्वाक्षरित केल्याची तारीख | - | ०२/०३/२०२२. |
| आदेश सी.आय.एस.प्रणाली मध्ये अपलोड केल्याची तारीख | - | ०३/०३/२०२२. |